# सार्वत्रिक निवडणूक-सन २०२२

**राज्यातील माहे एप्रिल-२०२० ते माहे मार्च-२०२२ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या नवनिर्मित अशा एकूण २०७ नगरपरिषदांच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी सुधारित प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२**

**जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर**
**नगरपालिका प्रशासन विभाग,**
**आदेश क्र.कार्या.११/नपा/निवडणूक/एसआर/14 ब/२२, दि. 09/05/2022**

वाचले –

१. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील क्र. रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०२/का-०६, दि. २२ फेब्रुवारी, २०२२ चे आदेश

२. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील क्र. रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०३/का-०६, दि. २३ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे पत्र

३. मा. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील क्र. रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०२/का-०६, दि. १४ मार्च, २०२२ रोजीचे पत्र

४. सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२१, दि.११ मार्च, २०२२

५. इकडील आदेश क्र.कार्या.११/नपा/निवडणूक/एसआर/१३ब/२२, दि.२२/०३/२०२२

६. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील क्र. रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०२/का-०६, दि. ०६ मे, २०२२ चे आदेश

---

## -आदेश-

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग , महाराष्ट्र यांनी उक्त वाचले क्र.१ व २ अन्वये नगरपरिषदेच्या प्रभाग रचनेबाबत कार्यक्रम लागू करण्यात आलेला होता. सदर निवडणूक कार्यक्रमाचे अनुषंगाने कोल्हापूर जिल्हयातील ९ नगरपरिषदांकडील प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देऊन प्रसिध्दी देण्यात आलेली होती. तथापी वाचले क्र.४ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायतीव औदयोगिक नगरी अधिनियमामधील संदर्भ क्र.४ अन्वये सुधारणा झालेबाबत वाचले क्र.३ अन्वये सुचित करण्यात आलेले आहे. तसेच वाचले क्र.३ मध्ये **" राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त वाचले क्र.१ व २ च्या आदेशानुसार सुरु करण्यात आलेली प्रभाग रचनेची पुढील कार्यवाही यापुढे उक्त वाचले क्र.४ च्या अधिनियमातील नवीन तरतुदींनुसार राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे करण्यात यावी"**, असे नमूद केलेले होते.त्यानुसार मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचे उक्त वाचले क्र.३ च्या पत्रामधील निर्देशानुसार राज्य शासनाचे पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत वाचले क्र.१ व २ अन्वये प्रस्तावित **निवडणूक कार्यक्रमास संदर्भ क्र.५ अन्वये स्थगिती देण्यात आलेली** होती.

प्रकरणी संदर्भ क्र.६ अन्वये **कोल्हापूर जिल्हयातील एकूण ९ नगरपरिषदांचा सुधारित प्रभाग रचना कार्यक्रम** जाहिर झाला असून संदर्भ क्र.५ अन्वये **निवडणूक कार्यक्रमास देण्यात आलेली स्थगिती रद्द करुन** मी, जिल्हाधिकारी, कोल्हापूर संदर्भ क्र.६ चे आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार **या आदेशा सोबत जोडलेल्या प्रकटनाद्वारे सुधारित प्रारुप** प्रभाग रचना कार्यक्रम जाहिर करीत आहे.

09/05/22

(राहुल रेखावार)
जिल्हाधिकारी, कोल्हापूर

प्रति,

प्रशासक/मुख्य अधिकारी
इचलकरंजी/जयसिंगपूर/कागल/वडगांव/गडहिंग्लज/कुरुंदवाड/मुरगूड/मलकापूर/पन्हाळा

/- सदर आदेश तात्काळ आपले नगरपरिषदांकडील **नोटीस बोर्डवर तसेच आपले नगरपरिषद वेबसाईटवर प्रसिध्द** करावा. तसेच या आदेशासोबतचे जाहिर प्रकटन दि.१०/०५/२०२२ रोजीच्या **वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन** त्याचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

# जाहीर प्रकटन

मा.राज्य निवडणूक आयोगाकडील दि.६/५/२०२२ चे पत्रातील सुचनांनुसार इचलकरंजी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमासाठी नगरपरिषदेचा सुधारीत प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२ खालीलप्रमाणे जाहीर करणेत येत आहे

| न.प.चे वर्गवारी | अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करणेचा / संपविणेचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ‘अ’ वर्ग नगरपरिषदांसाठी | **अ) प्रारुप प्रभाग रचना कार्यक्रम** | | | |
| | १ | हरकती व सुचना मागविणेचा कालावधी | -- | १०/५/२०२२ ते १४/५/२०२२ |
| | २ | प्राप्त हरकती व सुचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | २३/५/२०२२ पर्यंत |
| | ३ | हरकती व सुचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन राज्य निवडणूक आयुक्त, यांचेकडे अहवाल पाठविणे. | जिल्हाधिकारी | ३०/५/२०२२ पर्यंत |
| | ४ | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | राज्य निवणूक आयुक्त | दि.६/६/२०२२ पर्यंत |
| | **ब) अंतिम प्रभाग रचना कार्यक्रम** (प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या) | | | |
| | १ | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ७/६/२०२२ |

सबब या जाहीर प्रकटनाद्वारे सर्व नागरीकांना कळविणेत येते की, उक्त विवरणपत्रामध्ये नमुद कालावधीमध्ये हरकती व सुचना मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद यांचेकडे सादर कराव्यात. विहीत कालावधीनंतर प्राप्त होणा-या हरकती व सुचनांचा विचार केला जाणार नाही.

09/05/22

(राहुल रेखावार)

**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**